## (१) : महाराष्ट्र राज्य :

जैनधर्म प्रचार, प्रसार महाराष्ट्र राज्यात अनादिकाळापासून झाल्याचे उपलब्ध, साहित्य, शिल्पकला, भव्यमंदिरे यावरून दिसून येते. उस्मानाबादजवळील ८-९ व्या शतकातील जैन गुंफ़ा वेरूळमधील गुंफ़ा क्रमांक २८ ते ३४ जैन शिल्पकला दर्शविते. गजपंथ अजनेरीमधील गुंफ़ा यावरुन अतिप्राचिन काळी जैन धर्माचा प्रसार झाल्याचे सिध्द होते. मांगी- तुंगी, तेर, नेमगिरी, इ ारी, गिरी पार्श्वनाथ कुंडलमधील जैन मूर्ती. पुरातत्व विभागाच्या संशोधनावरून ४ थ्या ५व्या शतकातील आहेत. अलिकडिल १५० वर्षापूर्वी दहिगांव क्षेत्रातील ब्र. महतीसागरजी यांच्या धर्मप्रचाराने आणि १०० वर्षापासून जैन मूनी पंरपरा, त्यागी आणि विद्वान यांची साहित्य निर्मिती . कारंजा, बाहुबली सोलापूरातील जैन शिक्षण क्षेत्रे पंडित जिनदासजी फ़डकुले आणि पंडित वर्धमान शास्त्री यांचे रसाळ भाषेतील जैन साहित्य. गुरूकुलीन पध्दतीच्या शिक्षणाचे शिल्पकार गुरूदेव आचार्य समंतभद्रजी, महाराष्ट्रात १ कोटी रू . निधी अल्पावधीत मिळ्वून ते जैन क्षेत्र संरक्षण निधीला देणारे महान तपस्वी आचार्य आर्यनंदी महाराज महाराष्ट्रातीलच. दानशूर दोशी आदि घराणे यामुळे महाराष्ट्रातील इतिहास समृध्द झाला आहे.

### अतिशयक्षेत्र - सावरगांव

मार्ग - सोलापूरहून सडकमार्गे २७ कि.मी सुरतगांव पाटीवरून दिंगबर जैन अतिशय क्षेत्र चिंतामणी पार्श्वनाथ मंदिर आहे. हेमाडपंथी बांधकाम सुबक असून मंदिराभोवताली मोठे आवार, धर्मशाळा, मानस्तंभ आहेत. मूलनायक भगवान पार्श्वनाथांची साडेतीन फूट उंचीची अतिप्राचिन पद्मासनस्थ मनोज्ञ अशी मूर्ती आहे. संपूर्ण मंदिराचे नुकतेच नुतनीकरण झाले असून शिखरातील मंदिर काचेचे बनविले आहे.

वार्षिक उस्तव - प्रतिवर्षी मार्गशिर्ष वद्य एकादशीस असतो.

सुविधा - सर्व सोईनी युक्त, धर्मशाळा व भोजनव्यवस्था उत्तम आहे.

## अतिशयक्षेत्र - तेर

मार्ग सोलापूरहून - उस्मानाबादमागे ८० कि.मी तेर हे ऐतिहासिक गाव आहे. त्याठिकाणी भगवान महावीर अतिशय क्षेत्र संस्थान आहे. मंदिर व परिसर चारशे वर्षापूर्वी सुबक अशा विटातून बांधकाम केलेले आहे. मूलनायक भगवान महावीरांची पद्मासनातील अतीप्राचीन पाच फूट उंच असलेली मनोज्ञ मूर्ती आहे. त्याचप्रमाणे भगवान पार्श्वनाथ तीर्थंकर यांची पाच फूट खडगासनातील मूर्तीची प्रतिष्ठा करावयाची आहे. तेर हे पुरातन व ऐतिहासिक शहर असल्याचे पुरावे या ठिकाणच्या उत्खननातून मिळालेल्या अनेक वस्तूंवरून व मुर्तीवरून समजते. भगवान महावीरांचे समवशरण तेर येथे झाल्याचा उल्लेख आढळतो. पाण्यावर तंरगणा-या विटा आजही सापडतात.

आख्यायिका: मंदिराजवळ विटांनी बांधलेली एक पुरातन विहीर आहे. असे म्हणतात, की पूर्वी भाविकांनी इच्छा केल्याप्रमाणे स्वंयपाकाची भांडी विहीरीतून पाण्यावर येत असत. काम झाल्यावर भाविक ती सर्व भांडी परत विहीरीत अर्पण करीत असत. परंतू एका लोभी भाविकाने भांडी परत अर्पण न केल्याने विहिरीतून भांडी येण्याचे बंद झाले.

वार्षिक उत्सव- प्रतिवर्षी माघ शुध्द पंचमीस असतो.

सुविधा - धर्मशाळा उपलब्ध असून भोजनाची सोय नाही.

## :सिध्दक्षेत्र कुंथलगिरी - वंशस्थळ :

मार्ग: सोलापूरहून सडक मार्गे उस्मानाबाद किंवा बार्शीहून १२० कि.मी अंतर आहे. मराठवाड्यातील एकमेव सिध्दक्षेत्र. देशभूषण - कुलभूषण सिध्दक्षेत्र संस्थान. भगवान देशभूषण व कुलभूषण यांची निर्वाण भूमी व आधुनिक युगातील आचार्य १०८ शांतीसागर महाराज, १०८ श्री वीरसागर महाराज, व १०८ श्री वृषभसागर महाराज यांची संलेखना व निर्वाणभूमी, ब्रं. पार्श्वसागर महारांजाच्या अथक प्रयत्नाने पंचाहत्तर वर्षापूर्वी हे क्षेत्र निझामी राजवटीमध्ये

असताना महाराजांनी पाच मैलाचा परिसर अहिंसा फ़िल्ड ( प्राणी हत्या बंदी) म्हणून राजाकडून मंजूर करून घेतला होता. पार्श्वसागर महाराजांनी गुरूकुल स्थापले. पहाडावर भगवान देशभूषण - कुलभूषण यांचे भव्य मंदिर व सुबक अशा मनोज्ञ मूर्त्या, त्याचप्रमाणे स्फ़टिकाच्याही मूर्त्या मंदिरात आहेत. मंदिराशेजारी भगवान बाहुबली यांची एकवीस फूट सातिशय मूर्ती , पहाडाच्या उतारावर आचार्य श्री १०८ शांतीसागर महाराजांच्या चरणपादुका, भगवान अजितनाथ, आदिनाथ, नंदीश्वर, भ. महावीर मंदिर, सभागृह व समवशरण इत्यादी भव्य अशा इमारती परिसरात आहेत.मुलांसाठी गुरूकुल वसतिगृह, हायस्कुलच्या स्वतंत्र इमारती असून संपूर्ण परिसर निसर्गाने नटलेला आहे.

वार्षिक रथोस्तव - मार्गशिष पौर्णिमा प्रतिवर्ष.

सुविधा - जुनी व नवीन धर्मशाळा सर्व सुविधानी युक्त असून उत्तम भोजन व्यवस्था उपलब्ध आहे.

## : अतिशयक्षेत्र - कचनेर :

मार्ग: सोलापूरहून सोलापूर - औरंगाबाद सडकमार्गे ३२० कि.मी अंतरावर आणि औरंगाबादकडून ३७ कि.मी अंतरावर राज्य महामार्गापासून ७ कि.मी आत कचनेर गाव आहे. दिगंबर जैन अतिशय क्षेत्र चितांमणी पार्श्वनाथ मंदिर आहे. मूलनायक १००८ भ. पार्श्वनाथांची चमत्कारी मनोज्ञ अशी मूर्ती आहे.अडीचशे वर्षापूर्वी भू- गर्भातून मूर्तीप्राप्त झाल्याचे सांगतात. त्यानंतर एक दुर्दैवी घटना घडली. मूर्तीची मान धडापासून अचानक वेगळी झाली असता सर्व श्रावकाना चिंता उत्पन्न झाली. शेवटी जिन मूर्ती विसर्जित करण्याचे ठरविले. परंतू एका जैन कार्यकर्त्याच्या स्वप्नात आले की मला विसर्जित करू नका. एका बंद खोलीत साखर- तुपाच्या पात्रात मानेसहीत ठेवावे व सात दिवस अखंड जाप व किर्तन करावे. दृष्टांताप्रमाणे सातव्या दिवशी खोलीचा दरवाजा उघडून पाहताक्षणी सर्वाना आश्चर्य वाटले. खंडित प्रतिमा परत अखंड

झाली. आजपर्यंत मानेचे ठिकाणी प्रतिमेवर खुणा दिसतात. भाविक लोक सतत मनोकामना व भक्तीसाठी क्षेत्रावर येत असतात. संस्थेकडून सध्या शंभर मुलांसाठी नि:शुल्क भोजन व राहणे, गुरूकुल, हायस्कुल आणि टेक्निकल स्कूल चालविले जाते. संपूर्ण मंदिराचा परिसर संगमरवरी दगडाने सुशोभित केलेला आहे.

वार्षिक उत्सव: प्रतिवर्षी कार्तिक शुध्द १५, या मितीस साजरा होता.

सुविधा: भव्य स्वागत कक्ष, आधुनिक सोइंनीयुक्त अशी धर्मशाळा, भोजनगृह उपलब्ध आहे. औरंगाबादहून यात्रेकरूं साठी दररोज सकाळी ७-०० व सांय ५-०० वाजता क्षेत्रातर्फ़े मिनीबसची सोय उपलब्ध आहे.

संपर्कपत्ता: श्री चंद्रसागर दिगंबर जैन धर्मशाळा, शहाजंग , औरंगाबाद.

## : अतिशय क्षेत्र - एलोरा :

मार्ग: औरंगाबादपासून सडक मार्गे २२ कि. मी अंतरावर एलोराच्या ऐतिहासिक प्रसिध्द गुंफ़ा आहेत. पैकी ३० ते ३५ क्रमांक गुंफ़ा जैन धर्माच्या आहेत. ह्या सर्व गुंफ़ा ७ ते १० व्या शतकातील असाव्यात. एलोरा गुंफ़ाच्या पाठीमागील बाजूस पार्श्वनाथ तीर्थकराची पद्मसनातील १६ फूट उंच अशी भव्य मूर्ती आहे. एलोरा गावात श्री पार्श्वनाथ जैन गुरूकुल, अतिथी भवन, काचेचे जिनालय, असून धर्मशाळा, भोजनव्यवस्था आहे.

## : अतिशय क्षेत्र - जटवाडा :

मार्ग: औरंगाबादकर खुलताबादमार्गे केवळ १८ कि.मी अंतर श्री अतिशय क्षेत्र जटवाडा आहे. गावाजवळील टेकडीवर एकूण २१ जिनमूर्ती भूगर्भातून प्राप्त झाल्या. सर्व मूर्त्या मनोज्ञ

असून अतिप्राचिन आहेत. मूलनायक भू. पार्श्वनाथांची मूर्ती आहे. आचार्य १०८ देवनंदी मुनीच्या प्रेरणेने याठिकाणी भव्य जिन मंदिर, धर्मशाळा, अतिथीगृह बांधलेले आहेत. राहण्याची सोय आहे.

वार्षिक उत्सव: पौष वद्य ११.

## : अतिशय क्षेत्र - पैठण :

मार्ग: औरंगाबाद शहरापासून ४१ कि. मी श्री दिगंबर जैन मुनीसुव्रतनाथ अतिशयक्षेत्र आहे. मूलनायक भ. मुनीसुव्रतनाथ यांची चतुर्थकालीन मनोज्ञ मूर्ती उत्खननातून प्राप्त झाली आहे.

सुविधा: मंदिरामध्ये राहण्यासाठी सुविधांनी युक्त अशी धर्मशाळा आहे.

वार्षिक उत्सव : चैत्र शुध्द १०

## : दिगंबरजैन क्षेत्र - देवळाली :

मार्ग: नाशिक शहरापासून नाशिक रोड, रेल्वे स्टेशन मार्गे हे उपनगर असून कहान नगरात दिगंबरजैन कानजी स्वामी क्षेत्र आहे. संपूर्ण परिसरात भगवान महावीर, भ.चंद्रप्रभू आदीचे जिन मंदिर असून भव्य असे जैन ऐतिहासिक संग्रहालय चित्ररूपाने अत्यंत रेखीव असे आहे. स्वाध्याय मंदिर, जैन ग्रंथ भांडार, काचेचे भव्य असे अप्रतिम समवशरण मंदिर असून अत्यंत विलोभनिय ६५ फूट संगमरावरी दगडाचा मानस्तंभ आहे. परिसरात सर्व सोयींनी युक्त धर्मशाळा, भोजनगृह व औषधी शाळा असून त्या अत्यंत अल्पदरात भाविकांना उपलब्ध आहेत. त्याठिकाणी नेहमी विद्वानांचे प्रवचन, शिबीरे व जैन तत्वज्ञान शोध चर्चासत्र भरविले जातात. मंदिर समूहात स्वागतकक्ष असून ते यात्रेकरूंना योग्य मार्गदर्शन करीत असतात. तेरापंथी

दिगंबर जैन कमिटीकडून हे क्षेत्र चालविले जाते. मंदिराच्या परिसरात स्व. पं. कानजी स्वामी यांची विशाल मूर्ती आहे.

## : सिध्दक्षेत्र - गजपंथ :

मार्ग: नाशिक शहरापासून ६ कि.मी अंतरावर म्हसरूळ गावात दिगंबर जैन सिध्दक्षेत्र गजपंथाचे संस्थान आहे. त्याठिकाणी भगवान महावीर आदि तीर्थकरांच्या सातिशय अशा मूर्त्या, भव्य अशा काचेच्या निर्माण केलेल्या मंदिरात आहेत. संस्थानापासून ३ कि.मी अंरावर साध्या सडक मार्गे गजपंथा पहाडावर जाता येते.

जे बलभुद्र मुक्ती में गये आठ कोडी मुनी और हु भये ।

श्री गजपंथ शिखर सुविशाल, तिनकेचरण नमु तिहुकाल।।

या ठिकाणाहून सात बलभद्र मोक्षास गेले. जमिनीपासून पहाडावर चढण्यासाठी चारशे पस्तीस पाय-या आहेत. पाय-या चढण्यास कठीण आहेत. पहाडावर मुख्य प्रवेशाद्वाराजवळ सात बलभद्रांचे चरण आहेत. जवळच प्राचीन अशी दोन जिनमंदिरे असून एकात भ. पार्श्र्वनाथांची भूगर्भातून प्राप्त अशी अतिप्राचीन दहा फूट चार इंच पद्मासनाधिस्त नऊ फ़ण्याची मूर्ती आहे. दुस-या एका गुफ़ेत कोरीव अशा भगवंताच्या मूर्त्या असून बाजूस धरणेंद्र पद्मावतीच्या यक्ष-यक्षणीच्या मूर्त्या सिंहावर आरूढ असलेल्या आहेत. इतिहासामध्ये या लेण्यांचा उच्चार चांभारलेणी म्हणून होतो. परंतु ख-या अर्थाने म्हैसूरचे महाराज चामराज यांनी जीर्णोध्दार करू न मूर्तीची प्रतिष्ठा केली होती. म्हणून याला चामारलेणीही म्हणतात. पहाडावर पिण्याच्या पाण्याची सोय आहे. पहाडाच्या खाली नवनिर्मित असे जिन मंदिर असून त्याठिकाणी एक धर्मशाळा उपलब्ध आहे.

सुविधा: सिध्दक्षेत्र संस्थानात सर्व सोयींनी युक्त अशा धर्मशाळा व अल्पदरात उत्तम भोजनाची सोय आहे. गजपंथाची १६ कि.मी दूर अजनेरी क्षेत्र परिसरात दोन गुंफ़ा असून एका गुंफ़ेत भगवान मल्लीनाथांची तीन फूट उंचीची पद्मासनस्थ मूर्ती कोरलेली व दुस-या गुंफ़ेत पाच मूर्त्या आहेत.

वार्षिक उत्सव: माघ शुध्द १४.

## : सिध्दक्षेत्र - मांगीतुंगी :

मार्ग: नाशिकपासून मुंबई- आग्रा महामार्गावर ८८ कि.मी सटाणा व तेथून तहाराबाद २७ कि.मी व तेथून पक्क्या सडक मार्गापासून १० कि.मी अंतरावर श्री दि जैन सिध्दक्षेत्र मांगीतुंगी संस्थान आहे. या सिध्दक्षेत्रास धुळे मार्गेहीजाता येते.

राम हनु सुग्रीव सुडील, गव गवाक्ष निलमहानिल।
कोडी निन्याण्णवे मुक्ती पयान, तुंगीगिरी बंदौधरी ध्यान।।

सातपुडा पर्वतश्रेणीमध्ये महाराष्ट्र, गुजरात आणि म. प्रदेश सीमेवर अतिशय रम्य असे ठिकाण आहे. समुद्रसपाठीपासून मांगीशिखर जाण्यासाठी सुस्थितीत अशा तीन हजार पाय-या आहेत. पहाडावर चढण्याच्या मार्गावर २ गुंफ़ामध्ये तीर्थकरांच्या प्रतिमा आहेत. जवळच पाण्याचा छोटासा धबधबा आहे. मांगीतुंगी या शिखराच्या मार्गावर एक कमान असून डावीकडे मांगीस व उजवीकडे तुंगीस जाता येते. मांगीवरील नऊ गुंफ़ा आहेत. गुंफ़ा नंबर ६ ही भव्य असून भगवान आदीनाथांची श्वेतवर्ण प्रतिमा आहे. याठिकाणी जैन कथेनुसार आर्यिका सीतेच्या चरण पादुका आहेत. तुंगगिरी पहाडावर दोन प्रमुख गुंफ़ा असून प्रथम गुंफ़ेत भगवान चंद्रप्रभूची प्रतिमा विराजमान आहे. गुंफ़ेमध्ये भिंतीवर अनेक मूर्त्या कोरलेल्या आहेत. दुस-या गुंफ़ेत भगवान रामचंद्र आणि नल, निल, गवाक्ष यांच्या प्रतिमा विराजमान आहेत. त्याचप्रमाणे गुंफ़ेच्या बाहेर श्रीकृष्णांचे बंधू बलराम यांची पाठमोरी प्रतिमा असून अशी अख्ख्यायिका आहे की भगवान बलराम अत्यंत सुंदर व रू पवान होते. त्यामुळे त्यांचा इतरांना विशेषत: महिलांना हेवा वाटू नये ते पाठमोरे ध्यानस्थ्त बसत असत.

मांगीतुंगी संस्थानात २०० वर्षापूर्वीची मूलनायक भगवान पार्श्वनाथांची नऊ फ़णीयुक्त प्रतिमा आहे. दुसरे मंदिर भगवान आदीनाथांचे असून गर्भगृहात अनेक भव्य अशा मूर्त्या आहेत. इ.स. १९९६ साली आर्यिका ज्ञानमती माताजी यांचे प्रयत्नाने भ. मुनीसुव्रतनाथांची २१ फ़ुट भव्य काळ्या पाषाणातील मूर्ती व बाजूंनी २४ तीर्थंकरांच्या सतिशय अशा विविध रंगाच्या

संगमरवरी व नाविण्यपूर्ण अशा वेदीमध्ये प्रतिष्ठीत केलेल्या आहेत. मंदिराचे बांधकाम पूर्ण होत आलेले आहे.

सुविधा: जुनी व नविन धर्मशाळा. सर्व सोयींनी उपलब्ध असून भोजन सुविधा आहे.

## : अतिशयक्षेत्र - नवागड :

मार्ग: परभणी जिल्ह्यात परभणीवरून २० कि.मी आणि रेल्वे मार्ग नांदेड - वरून मिरखेल स्टेशनवरून ५ कि.मी अंतर आहे. श्री नेमिनाथ दि. जैन. अतिशयक्षेत्र आहे. १५० वर्षापूर्वी उखळद या गावाजवळ हे क्षेत्र पूर्णा नदीच्या काठी होते. परंतु ते मंदिर नष्ट झाल्यावर नवीन जागी सुंदर, भव्य मंदिर बांधले आहे.

आख्यायिका: भ. नेमिनाथाच्या उजव्या पायाच्या आंगठ्यात परिसमणी होता. तेथील पुजारी दररोज एक लोखंडाची सुई परिसाला स्पर्श करून, सोने बनवून , उपजिविका करीत असे. परतुं त्याच्या मुलाने हा नियम मोडून , मोहाला बळी पडून मोठ्या प्रमाणात सोन्याच्या निर्मितीसाठी प्रयत्न केल्याने मोठा आवाज होऊन तो मणी उडून नदीत पडला. श्री १०८ आचार्य आर्यनंदी महाराजाच्या प्रेरणेने नवनिर्मित गुरू कुल , वसतिगृह, धर्मशाळा झाल्या आहेत. नेहमी भाविकांची गर्दी असते.

सुविधा- उत्तम धर्मशाळा. राहण्याची, जेवण्याची नि:शुल्क सेवा उपलब्ध आहे.

वार्षिक उत्सव - माघ शुध्द-७

## अतिशय क्षेत्र - जिंतूर (नेमगिरी)

मार्ग: परभणी मार्गे ५० कि.मी व रेल्वे मार्ग ४१ कि.मी वर जिंतूर आहे. जिंतूर गावांत एकूण १४ जिनमंदीरे होती. परंतु कादरी नावाच्या मुसलमान अफ़गानी इसमाने ती मंदिरे नष्ट करून मशिदी बांधल्या.

नेमगिरी पहाडः जिंतूरपासून ४ कि.मी अंतरावर सह्याद्री डोंगराच्या श्रेणीमध्ये एका पहाडावर नेमगिरी अतिशय क्षेत्र आहे. एका गुंफ़ेत भ. नेमीनाथ तीर्थंकराची ६ फ़ूट उंच सतिशय प्रतिमा आहे. भ. पार्श्वनाथांची प्रतिमा एका लहान पाषाणाच्या आधारावर उभी आहे.

सुविधा- पहाडावर व जिंतूर येथे नवनिर्मित धर्मशाळा आहेत.

वार्षिक उत्सव- भाद्रपद ५

## अतिशयक्षेत्र शिरूड शहापूर

मार्ग: परभणीपासून ५० कि.मी सडकमार्गे आणि पूर्णा खांडवा रेल्वे मार्गावर चौडी स्टेशनपासून ८ कि.मी अंतरावर भ.मल्लीनाथाची सतिशय प्रतिमा आहे. नदीच्या दुस-या किना-यावर भट्टारक दैवेंद्रकिर्तीची समाधी आहे. आणि भ. शांतीनाथांचे मंदिर आहे. वार्षिक उत्सव मार्गषिश शु.११.

सुविधा: धर्मशाळा आहे.

## अतिशयक्षेत्र - चिंतामणी पार्श्वनाथ (असेनाथ)

मार्ग: परभणी जिल्ह्यात शिरड शहापूरपासून २४ कि.मी अंतरावर हे क्षेत्र आहे. या ठिकाणी एका भव्य मंदिरात भ. पार्श्वनाथ तीर्थंकरांची अतिशययुक्त प्रतिमा आहे. नेहमी या क्षेत्रावर भाविक आपली मनोकामना पूर्ण करण्यासाठी येत असतात.

## अतिशयक्षेत्र अंतरिक्ष पार्श्वनाथ (शिरपूर)

मार्ग: अकोल्यापासून सडक मार्ग ५० कि.मी आणि रेल्वे मार्गे ७० कि.मी हे क्षेत्र आहे. शिरपूर गावाच्या मध्यवस्तीमध्ये अष्टकोनी रचनात्मक उत्कृष्ट शिल्प असलेले विटांनी बांधलेले मंदिर आहे. या मंदिराची निर्मिती चोलवंशी राजा श्रीपाद यांनी केली होती.

आख्यायिका: ही मूर्ती अंतरिक्षामध्येच होती. मूर्ती खालून एक घोडेस्वार सहज जात असे. कालमानाने हा चमत्कार कमी कमी होत गेला आता फ़क्त एक कागद मूर्तीच्या खालून सहज आरपार जातो. मंदिरातील गर्भगृहामध्ये मूर्ती आहे. मंदिराच्या आसपास भट्टारकांच्या समाधीस्थळे आहेत. सध्या दिंगबर श्वेतांबर विवाद असल्याने मंदिराचे दार बंद असते. केवळ दरवाजाच्या झरोक्यातून दर्शन घेता येते.

सुविधा: दोन धर्मशाळा आहेत.

## अतिशयक्षेत्र - कारंजा (लाड)

मार्ग: अकोला जिल्ह्यातील हे क्षेत्र असून अमरावती व अकोल्यापासून ६२ कि.मी अंतरावर आहे. रेल्वे मार्गाने मूर्तिपूजापूरपासून ३२ कि.मी अंतरावर आहे. कारंजा हे गाव समृध्द गाव असून जैनांची संख्या मोठी आहे.

(१) दिंगबर जैन सेनगन मंदिर - मूलनायक पार्श्वनाथाची मूर्ती असून इतर १११ मूर्त्या आहेत. येथे सेनगन भट्टारकांची गादी होती. मंदिराच्या समोर भव्य मानस्तंभ व भट्टारकांचे चरण आहेत.

(२) श्री चंद्रनाथस्वामी काष्टासंघ जिनालय. मंदिरात अनेक मौल्यवान मूर्त्या असून पद्मावती मातेची सातिशय मूर्ती आहे. ४२ विशाल अशा लाकडी खांबावर कलात्मक असे शिल्प केलेले आहे. हे सर्व पाहून मन थक्क होते. मूलनायक चंद्रप्रभूची मूर्ती मंदिरात आहे. तेथील सर्व मंदिरामध्ये दुर्मिळ अशा कलात्मक पितळी मूर्त्या अत्यंत देखण्या आहेत. येथील ग्रंथ भांडारामध्ये २००० प्राचीन ग्रंथ आहेत. येथूनच जवळच गावाबाहेर श्री महावीर ब्रह्मचर्याश्रम आहे. येथील जिनमंदिरात दुर्मिळ अशा सोने, चांदी, हिरे, माणिक, पौळ यांच्या मूर्त्या आहेत.

सुविधा : गुरू कुल आश्रमात धर्मशाळा आहेत. भोजन सुविधा आहे.

## अतिशयक्षेत्र - भातुकली

मार्ग: अमरावती जिल्ह्यातील हे क्षेत्र आहे. अमरावतीपासून १६ कि.मी अंतरावर आहे. श्री आदिनाथ दिंगबर जैन अतिशयक्षेत्र म्हणून प्रसिध्द आहे. भूगर्भातून चमत्कारीक रीतीने प्राप्त झालेली भ. आदिनाथांची मूर्ती अतिशय संपन्न आहे.

आख्यायिका: एक गाय विशिष्ट ठिकाणी डोंगरावर जाऊन आपल्या दूध खाली जमिनीवर सोडत असे. हा चमत्कार पाहून लोकांनी ती जागा उत्खनन करून पाहिली असताना भ. आदिनाथांची प्रतिमा प्राप्त झाली. या ठिकाणी तीन मंदिरे आहेत. मुख्य मंदिराच्या समोर उत्कृष्ट कलाकुसरीच्या लाकडी खांबावर खुला मंडप आहे.

सुविधा: धर्मशाळा आहे.

## अतिशयक्षेत्र - रामटेक

मार्ग: नागपूरपासून सडकमार्गे ५० कि.मी ऐतिहासिक व पौराणिक असे हे क्षेत्र श्री शांतीनाथ दिंगबर जैन अतिशय क्षेत्र म्हणून ओळखले जाते. एका भव्य बांधलेल्या पराकोटामध्ये १५ जिनमंदिरे आहेत. मुख्य मंदिर भ. शांतीनाथाचे असून १५ फूट उंच सातिशय अशी प्रतिमा आहे. असे म्हणतात की, ३०० वर्षापूर्वी नागपूरचे राजे भोसले यांनी आपले मंत्री वर्धमान सावजी यांचेबरोबर रामटेक येथे भ.रामचंद्रजी, यांच्या दर्शनासाठी गेले असता दर्शन घेऊन राजाने वर्धमान सावजींना जेवण्याचा आग्रह केला. परंतु जिनदर्शनाशिवाय मी जेवणार नाही, असे सावजींनी सांगितले. राजआज्ञेप्रमाणे आसपासच्या जंगलामध्ये शोध घेतला असता भगवान शांतीनाथाची मूर्ती प्राप्त झाली. तेव्हा भोसले महाराजांनी येथे एक जिनालय व जवळच पहाडावर राममंदिर बांधले. प्रभूरामचंद्राचे आगमन या ठिकाणी झाले होते. त्याचप्रमाणे महाकवी कालिदासाने मेघदूत काव्य या ठिकाणी लिहले. पहाडावर राममंदिर, जानकीकुंड, कालीदास स्मारक इ. दर्शनीय स्थाने आहे.

सुविधा: मंदिर परिसरामध्ये अनेक भव्य धर्मशाळा व भोजन सुविधा आहे.

## अतिशयक्षेत्र - कुंडल

मार्ग: सांगली जिल्ह्यामध्ये हे क्षेत्र असून सडकमार्गे सांगलीपासून ५१ कि.मी आणि रेल्वे मार्गाने पुणे - मिरज रेल्वे लाईनवर किर्लोस्कर वाडीपासून ४ कि.मी अंतरावर आहे.

प्राचीन कालामध्ये या गावचे नाव कौंडन्यपूर होते. त्यानंतर त्याचा अपभ्रंश कुंडल असा झाला. गावामध्ये कलिकुंड पार्श्वनाथ जिनमंदिर आहे. येथे भ. महावीरांचे समशरण आले होते.

कुंडल गावापासून २ कि.मी अंतरावर एका निसर्गरम्य अशा पहाडावर भ. पार्श्वनाथांची मूर्ती व इतर अनेक मूर्त्या आहेत. त्याचबरोबर या गुंफ़ेत राम- सीता व हनुमान यांच्याही मूर्त्या आहेत. या क्षेत्राला झरी पार्श्वनाथ म्हणतात. झरी पार्श्वनाथपासून ४ कि.मी अंतरावर पहाडमार्गे दुस-या पहाडावर गिरीपार्श्वनाथ म्हणून सप्तफ़णी पार्श्वनाथांचे मंदिर आहे. त्याचप्रमाणे जवळच मैदानात चरण चिन्ह आहेत.

सुविधा:  धर्मशाळा आहे.

## अतिशयक्षेत्र - बाहुबली (कुंभोज)

मार्ग:  सोलापूर- कोल्हापूर मार्गावर सडकमार्गे २१० कि.मी आणि कोल्हापुराहुन हाणकणंगले मार्गे २६ कि.मी अंतरावर क्षेत्र आहे.

अतिशयक्षेत्र कुंभोज बाहुबली नावाने प्रसिध्द आहे. २५० वर्षापूर्वी मुनीश्री बाहुबली यांनी पहाडावर तपश्चर्या केली होती. त्यावेळेस स्थानिक जैन लोक त्यांना आहार देत असत. महाराजांच्या तपस्येमुळे अनेक व्याधी ब-या होत असत. महाराजांच्या तपस्येमुळे अनेक व्याधी ब-या होत असत. पूर्वी पहाडावर घनदाट जंगल होते. हिंस्त्र पशु देखील महाराजांच्या बाजूला बसत असत. महाराजांच्या चरण पादूका पहाडावर आहेत. पहाडावर मुनीश्री श्रुतसागर यांच्या प्रेरणेने भ. बाहुबलीची ६ फूट अशी सातिशय प्रतिमा व अनेक प्रतिमा आहेत. पहाडाच्या पायथ्याशी अत्यंत मनोरम  परिसर तयार करून ५० पाय-या चढून गेल्यावर एका भव्य अशा वेदीवर २८ फूट उंच असलेली भ. बाहुबलीची प्रतिमा आहे. १९६३ साली याची प्रतिष्ठा
झाली. बाजूने अनेक दर्शनीय मंदीर समूह आहेत. आचार्य समंतभद्र यांच्या प्रेरणेने बाहुबली ब्रह्मचर्य आश्रम, गुरू कुल, हायस्कुल, टेक्निकल स्कूल इ.शैक्षणिक प्रतिष्टाने आहेत. आचार्य श्री समंतभद्र महाराजांनी इ.स. १९३३- ३४ मध्ये या क्षेत्रावर बाहुबली ब्रह्मचर्याश्रमाची स्थापना केली.

सुविधा: उत्तम धर्मशाळा, सर्व सोईनीयुक्त आहेत व भोजन व्यवस्था आहे.

## अतिशयक्षेत्र - दहिगाव

मार्ग:  सोलापूर - नातेपूते मार्गे वालचंदनगरकडे जाणा-या मार्गावर ६ कि.मी अंतरावर दहिगाव हे क्षेत्र आहे. मूलनायक भ. महावीरांची सातिशय प्रतिमा मंदिरात आहे. मंदिराच्या भुयारगृहात २० विद्यमान तीर्थंकरांच्या भव्य अशा मूर्त्या आहेत. मूर्तीची प्रतिष्ठा संवत १९१० मध्ये झालेली आहे. १५० वर्षापूर्वी या ठिकाणी ब्रह्मचारी महतीसागर यांनी जैन धर्माची प्रभावना केली.

त्यांच्या चरण पादुका या ठिकाणी आहेत. भक्तांची अशी श्रध्दा आहे की चरण पादुकांच्या दर्शनाने आपली मनोकामना पूर्ण होते.

वार्षिक रथोत्सव: या ठिकाणी एक जैन गुरू कुल व वसतिगृह आहे.

सुविधा: धर्मशाळा आणि भोजन व्यवस्था आहे.

## अतिशयक्षेत्र - आष्टाकासार

मार्ग: सोलापूरपासून सोलापूर- हैद्राबाद महामार्गावर ५१ कि.मी अंतरावर आष्टाकासार अतिशयक्षेत्र आहे. गावामध्ये एक भव्य मंदिर असून भ.पार्श्वनाथांची सातिशय अशी मूर्ती आहे. भक्तीने पूजा केल्यास विघ्ने टळतात अशी श्रध्दा असल्याने याला भक्तगण विध्नहर पार्श्वनाथ असे म्हणतात.

आख्यायिका : ५०० वर्षापूर्वी मुस्लिम शासन काळात त्यांचेकडून मूर्ती भग्न होऊ नये म्हणून सुरक्षिततेसाठी एका बंद पेटीतून ही मूर्ती बैलगाडीतून जात असता दस्तापूर या गावाच्या बाहेर अचानक गाडी थांबली. त्याच रात्री आष्टाकासार येथील एका स्त्रीच्या स्वप्नात आले की मूर्ती येथून पूढे जाणार नाही. इथेच स्थापन करावी त्याकरीता गावक-यांनी हा चमत्कार पाहून भक्तीभावाने येथेच मूर्ती स्थापन केली. नेहमी भक्तगण भगवंतास तुपाचा अभिषेक करीत असतात.

सुविधा: मंदिरामध्येच सर्व सुविधायुक्त धर्मशाळा आहे.

वार्षिक उत्सव: प्रतिवर्षी चैत्र कृ ४.

## अतिशयक्षेत्र - सोलापूर

मार्ग: सोलापूर हे औद्योगिक व ऐतिहासिक शहर असून १६ पूर म्हणजे सोळा गावांचे बनलेले शहर आहे असे मानतात. याठिकाणी अनेक धर्मियांचे क्षेत्र आहे. जैन समाजही बहुसंख्येने आहे. सोलापूरात एकूण ५ जिनमंदिरे आहेत.

(१) अतिशयक्षेत्र दिंगबर जैन चिंतामणी पार्श्वनाथ मंदिर

(२) दि जैन आदिनाथ मंदिर (शुक्रवार पेठ)

(३) रत्नात्रय मंदिर

(४) दि जैन माणीकप्रभू मंदिर

(५) दि जैन आदिनाथ मंदिर (चाटीगल्ली)

शिवाय बाळीवेस येथे जैन बोर्डिंग, महावीर मंदिर आणि श्राविका आश्रम येथे नवनिर्मीत भव्य असे भ. महावीर मंदिर आहे. सोलापुरात श्राविका जैन विद्यापीठ आणि गुरू कुल प्रशाला असून हिराचंद नेमचंद धर्मशाळा, महावीर सांस्कृतिक भवन आणि श्री पार्श्वनाथ दिंगबर जैन धर्मशाळा( कासारमदिर) येथे राहण्याची उत्तम सोय आहे.

## क्षेत्र - कासारशिरसी

मार्ग: सोलापूरहून १२० कि.मी आणि का. आष्टा क्षेत्रावरून ४५ कि.मी अंतरावर हे क्षेत्र आहे. गावामध्ये दिंगबर जैन भ. आदिनाथ मंदिर असून वेदीवर इतर जिनमूर्त्या आहेत. मंदिराच्या शिखरात नवनिर्मित काच मंदिर असून मंदिराभोवताली त्यागी निवास व धर्मशाळा आहेत. येथे जैन सिध्दांत प्रसारक मंडळाचे प्रधान कार्यालय असून त्यांचे प्रमुख विद्वान श्री. जिवनदादा पाटील हे परिसरातील समाजासाठी नियमीत शिबिरे व चर्चासत्रे आयोजित करित असताना महाराष्ट्रात एकूण सन्मतिसेवादलाच्या १५० शाखा आहेत. त्याद्वारे धर्मप्रभावना केली जाते. येथील समाज धार्मिक आहे.

वार्षिक उत्सव: जलयात्रा भाद्रपद शु.- १५.